उप वनसंरक्षक, अलिबाग वन विभाग, अलिबाग यांचे कार्यालय
मु.पो.ता. अलिबाग. जि. रायगड, पीन नं. 402201, फोन नं. 02141-222016, फॅक्स नं. 02141-222216
ईमेल - dycfalibag@mahaforest.gov.in

पत्र

विषयः- **वन जमिन रायगड.**
राष्ट्रीय महामार्ग क्र. 4बी व 348 (जुना रा. मा. क्र. 54 व आमरा मार्ग)मधील पुरवणी 1.036 हे. वनजमिन मागणी प्रस्ताव. भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधीकरण.

जावक क्र. ब/20/जमिन/ 5738 /2017-18.
अलिबाग – 402 201, दिनांकः- 3 /02/2018.

प्रति,

मुख्य व्यस्थापक (तांत्रीक) व प्रकल्प संचालक,
राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण,
पीआयु-पनवेल, सर्व्हे नंबर 63,
एनएच-4बी, डी-पाईंट, चिंचपाडा-कळंबोली बायपास रोड,
पनवेल - 410 206.

संदर्भः- मुख्य व्यस्थापक (तांत्रीक) व प्रकल्प संचालक, पीआययु पनवेल यांचे कडील पत्र क्र. एनएचएआय/पीआययु/पनवेल/एमजेपीआरसीएल/2017/2698 दिनांक 15/12/2017.

आपलेकडील संदर्भिय पत्रान्वये विषयांकीत प्रस्ताव या कार्यालयास दाखल केला आहे. सदर प्रस्तावाची छाननी केली असता, त्यामध्ये खालील प्रमाणे त्रुटी आढळून येत आहेत.

1. प्रस्तावांत समाविष्ठ मौजे मानघर या गावामध्ये राखीव वनाचे क्षेत्र चुकीने संरक्षीत वनाचे दर्शविलेले आहे, त्यामध्ये सुधारणा होणे आवश्यक आहे.

2. प्रकरणी प्रस्तावीत केलेले वनक्षेत्रामध्ये वनेत्तर कामे केली असल्यास त्याप्रमाणे विहीत वनभंगाची टिपणी प्रस्तावांत सामिल करणे आवश्यक राहील.

सोबत सदर प्रस्तावाच्या सर्व प्रती परत केल्या आहेत. तरी वरील प्रमाणे बाबींची पूर्तता करुन परिपूर्ण प्रस्ताव हार्ड कॉपी तसेच forestsclearance.nic.in या संकेतस्थळावर अपलोड करणेस विनंती आहे. जेणेकरुन सदर प्रस्ताव परिपूर्ण पूर्ततेसह वरीष्ठांमार्फत

केंद्रशासनाचे मान्यतेकरीता सादर करणे शक्य होईल.

सहपत्रः- वरील प्रमाणे.

उप वनसंरक्षक,
अलिबाग.

प्रतिलिपीः- मुख्य वनसंरक्षक, ठाणे यांचेकडे माहितीसाठी सादर.

प्रतः- सहाय्यक वनसंरक्षक, पनवेल व परिक्षेत्र वन अधिकारी, उरण यांचेकडे माहितीसाठी रवाना.

2/- त्यांनी यंत्रणेने प्रस्तावीत केलेले आखणी मार्गात वनेत्तर कामे केली आहेत अगर कसे याबाबत खात्री करुन प्रकरणी अनियमीतता आढळल्यास संबंधीतांवर तात्काळ नियमोचीत कारवाई करुन अहवाल तात्काळ या कार्यालयात सादर करावा. सदर प्रकरणी मा. प्रधानमंत्री व मा. मुख्य मंत्री कार्यालयाकडून पाठपुरावा होत असल्याने प्रकरणी तात्काळ कार्यवाही करणेत येईल अन्वये दिलेल्या सूचनांनुसार कोणतीही कार्यवाही केलेली दिसून येत नाही. तरी सदरच्या महत्वाचे व तातडीचे प्रकरणी सदर पत्रान्वये दिलेल्या सूचनांनुसार त्यांचा स्वयंस्पष्ट अहवाल दोन दिवसांत प्रस्तावाचे संचासह या कार्यालयास सादर करावा.

प्रतः- वनक्षेत्र सर्व्हेक्षक, अलिबाग यांचकडे माहितीसाठी रवाना.